जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - ६९९ दिनांक -१६/०९/२०२३**

खडक पोलीस स्टेशन,पुणे शहर

**शहराचे मुख्य रस्त्यावरुन पहाटेच्या वेळी प्रवास करणा-या कारचालकाचा मोबाइल व रोख रक्कम जबरदस्तीने हिसकावणारी टोळी २४ तासांचे जेरबंद**

दिनांक १४/०९/२०२३ रोजी पहाटे सुमारास शंकरशेठ रोड, सेव्हन लव चौक जवळील मुख्य रस्त्यावर फिर्यादी हे मित्राच्या आईवडीलांना घेण्यासाठी त्यांची कार ने जात असताना ऑटो रिक्षास पाठीमागुन धडकल्याने सदरवेळी रिक्षा चालक व फिर्यादी यांच्यात वाद चालु झाले. त्यावेळी सदर ठिकाणी एका दुचाकी मोपेड गाडीवरुन तिन अनोळखी इसम आले. यांनी आपसांत संगनमत करुन फिर्यादी यांना धाकदपटशा दाखवुन, झटापट करुन फिर्यादी यांचे खिशातील रोख रक्क्म २०,०००/- व १५,०००/रु किं.चा मोबाइल हॅण्डसेट व कारची चावी असा ऐवज जबरदस्तीने चोरी करुन ते सर्व सदर ठिकाणाहुन पळुन गेले. घडल्या प्रकाराबाबत फिर्यादी यांनी तक्रार दिलेल्या तक्रीवरुन खडक पोलीस स्टेशन गुन्हा रजि क्रमांक ३०७/२०२३ भा.द.वि.क. ३९२,३४ प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला.

घडलेला गुन्हा हा गंभीर स्वरुपाचा असल्याने त्याचा तपास करुन आरोपींचा शोध घेण्यासाठी श्री. सुनिल माने, वरिष्ठ पोलीस निरिक्षक, खडक पोलीस स्टेशन पुणे यांचे मार्गदर्शनाखाली तात्काळ सहायक पोलीस निरीक्षक राकेश जाधव व तपास पथकातील अंमलदार यांचे तपास पथक नेमण्यात आले. फिर्यादी यांचेकडे अधिक सखोल चौकशी करुन केलेल्या तांत्रिक तपासाच्या आधारे नमुद गुन्हयातील आरोपी रिक्षाचालक नामे रविंद्र मधुकर ढावरे वय ४५ वर्षे, यास शिवाजी आखाडा, जुना बाजार,२२६/मंगळवार पेठ, काची मळा येथुन ताब्यात घेवुन नमुद गुन्हयात अटक करण्यात आली.

उर्वरीत तीन अनोळखी आरोपींचा शोध घेण्यासाठी शंकरशेठ रोड, सेव्हन लव चौक, नेहरु रोड या परिसरातील जवळपास ४० ते ५० सी.सी.टि.व्हि.कॅमेरांची पाहणी केली असता सदर तीन आरोपी हे स्थानिक असल्याची खात्री झाली. त्यानंतर तपास पथकातील अंमलदार संदीप तळेकर,सागर घाडगे यांना त्यांचे बातमीदारांमार्फत सदर तीन अनोळखी इसम हे भिमाले संकुल येथील पार्कींग येथे आले असल्याची खात्रीशीर माहीती मिळाल्याने तात्काळ सदर ठिकाणी स्टाफसह जावुन सापळा रचुन इसम नामे **१) प्रथमेश उर्फ पत्या प्रमोद कांबळे, वय २३ वर्षे, रा. म्हसोबा मंदिर जवळ, कासेवाडी पुणे २) विशाल शंकर कसब, वय २३ वर्षे, रा. कासेवाडी पोलीस चौकी जवळ, कासेवाडी पुणे ३) सुशिल राजु मोरे वय २० वर्षे, रा.१० नंबर कॅालनी, कासेवाडी पुणे** यांना ताब्यात घेवुन गुन्हयात अटक करण्यात आले.

अटक करण्यात आलेल्या आरोपींकडुन गुन्हयात जबरी चोरी करुन नेलेला १५,०००/रु किं.चा मोबाइल हॅण्डसेट व ५०००/रु रोख रक्कम असा ऐवज जप्त करण्यात आला. तसेच गुन्हा करताना वापरलेली दुचाकी व रिक्षा ही वाहने तपासकामी जप्त करण्यात आली. पुढिल तपास सहायक पोलीस निरिक्षक, श्री. हणुमंत काळे हे करीत आहेत.

नमुद सर्व कारवाई ही, मा.अपर पोलीस आयुक्त पश्चिम प्रादेशिक विभाग पुणे, श्री. प्रविण पाटील, मा.पोलीस उप आयुक्त परिमंडळ १ श्री.संदिपसिंह गिल,मा.सहा पोलीस आयुक्त फरासखाना विभाग श्री. अशोक धुमाळ यांचे मार्गदर्शनाखाली खडक पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. सुनिल माने, पोलीस निरीक्षक (गुन्हे),श्री. संपतराव राउत, तपास पथक अधिकारी सहायक पोलीस निरीक्षक, श्री. राकेश जाधव,श्री. हणुमंत काळे तसेच पोलीस अंमलदार अजीज बेग, संदिप तळेकर, सागर घाडगे, मंगेश गायकवाड, रफिक नदाफ, सागर कुडले, अक्षयकुमार वाबळे, विशाल जाधव, लखन ढावरे, योगेश चंदेल यांचे पथकाने केली आहे.